# प्रेस नोट

## डीएसके आर्थिक घोटाळ्या संबधी बँक ऑफ महाराष्ट्रचे संबंधीत अधिकारी व डीएसकेडीएल कंपनीचे संबंधीत अधिकारी यांना अटक

शिवाजीनगर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे फिर्यादी श्री जितेंद्र नारायण मुळेकर रा. कोथरुड यांचे तक्रारी वरुन गु.र.नं ३४७/२०१७ भा.द.स कलम ४०६, ,४०९, ४११, ४२०,४६७,४६८,४७१,३४,१२०(ब) सह एमपीआयडी कायदा कलम ३ व ४ तसेच प्राईज चिट ॲन्ड मनी सर्क्युलेशन (बॅनींग) कायदा १९७८ चे कलम ३,४,५,६ तसेच भारतीय रिझर्व बॅक ॲक्ट १९३४ चे कलम ४५ एस, ४५ आय, ए/५८ अन्वये गुन्हा दाखल झाला असुन त्यामध्ये आतापर्यंत दीपक सखाराम कुलकर्णी, हेमंती दीपक कुलकर्णी, सई केदार वांजपे, केदार वांजपे, धनंजय पाचपोर व विनयकुमार बाडगंडी, अनुराधा पुरंदरे यांना अटक झाली आहे. सध्यःस्थितीत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

आतापर्यंत झालेल्या तपासात डीएसके उदयोग समुहाकडून (१) ठेवी व कर्ज स्वरुपातील रुपये १०८३.७ कोटी (२) वित्तीय संस्था/ बँका यांचे कडून रुपये ७११.३६ कोटी (३) डीबेन्चर्स (कर्ज रोखे ) यांचे द्वारे रुपये १११.३५ कोटी आणि (४) फुरसुंगी येथील जमीनीच्या व्यवहारातून झालेल्या अपहाराद्वारे रुपये १३६.७७ कोटी असा एकूण रुपये २०४३.१८ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

दीपक सखाराम कुलकर्णी व त्यांची पत्नी हेमंती दीपक कुलकर्णी यांचे विरुद्ध दिनांक १७/०५/२०१८ रोजी मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. तर उर्वरीत आरोपी यांचे विरुद्ध गुन्हयातील त्यांचा सहभाग निश्चित करुन व त्यांचे विरुद्ध सबळ पुरावा गोळा करुन त्यांचे विरुद्ध पुरवणी दोषारोप पत्र पाठविण्यात येत आहे. यातील पाहीजे आरोपी शिरीष दीपक कुलकर्णी यास सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २५/०६/२०१८ रोजी पर्यंत पोलीसां समोर हजर होणे विषयीचे आदेश पारीत केले आहेत.

आता पर्यंतच्या झालेल्या तपासा मध्ये डी.एस.के उदयोग समूहाला बेकायदेशीर कर्ज वाटप करुन त्यांचा फायदा करुन देण्यात आला आहे. बँकांचे नुकसान करुन केलेले कर्ज वाटप हे बेकादेशीर नियम बाहय रीर्जव्ह बँक ऑफ इंडीयांच्या आदेशांच्या विपरीत आहेत. सदर कर्ज वितरीत करताना पैसे कोणाकडे जात आहेत हा कर्ज विनियोग दाखला तपासणे हे बँकांचे कर्तव्य असते. परंतू त्या कर्तव्याचे पालन झालेले नाही. या उलट बुडत असलेल्या डीएस कुलकर्णी समुहाला कर्जपुरवठा करण्यात आला आहे. या सर्व बाबींचा विचार करुन त्यामध्ये सहभागी असलेल्या खालील नमुद आरोपींना आज दिनांक २०/०६/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

१) रविंद्र प्रभाकर मराठे , अध्यक्ष व व्यवस्थपकीय संचालक बँक ऑफ महाराष्ट्र
२) राजेंद्र कुमार वेदप्रकाश गुप्ता, कार्यकारी संचालक बँक ऑफ महाराष्ट्र
३) सुशिल मुहनोत ,माजी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बँक ऑफ महाराष्ट्र
४) नित्यानंद सदाशिव देशपांडे, झोनल मॅनेजर बँक ऑफ महाराष्ट्र
५) सुनिल मधुकर घाटपांडे ,डी.एस. कुलकर्णी डेव्हलपर्सचे सनदी लेखापाल (सीए)
६) राजीव दुल्लभ दास नेवासकर ,मुख्य अभियंता व उपाध्यक्ष डीएस कुलकर्णी डेव्हलपर्स लि.

या पैकी आरोपी क्रमांक ३ व ४ यांना आज रोजी अनुक्रमे अहमदाबाद व जयपुर येथून ताब्यात घेण्यात आले असून त्यांना घेवून पोलीस पथके पुण्याकडे रवाना झाली आहेत. इतर आरोपी क्रमांक १,२,५ व ६ यांना आज रोजी मा. न्यायालया समोर हजर केले असता त्यांना दिनांक २७/०६/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केलेली आहे.

उपरोक्त गुन्हाचा पुढील तपास चालू आहे.